# इंग्लंडच्या संसदीय लोकशाहीचा विकास

श्री.योगेश महादेव माळी– संशोधक विद्यार्थी,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**प्रस्तावना–**

इंग्लंडची संसदीय शासन पद्धती ही संपूर्ण जगाच्या संसदीय शासन पद्धतीची जांनी मानली जाते. इंग्लंडची संसदीय शासन पद्धती राजपद, प्रिव्ही कौन्सिल, मंत्रिमंडळ, पंतप्रधान, संसद, राजकीय पक्ष, न्यायमंडळ या सर्वांच्या एकत्रीकरणाने तयार झालेली आहे. १६८८ ची रक्तहीन क्रांती ज्यात संसद सार्वभौम झाली तर पुढील काळात संसदेचे कार्य जास्तीत जास्त लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न झाला. प्रस्तुत संशोधनात इंग्लंडच्या संसदीय लोकशाहीच्या विकासाचा आढावा घेण्यात आला आहे.

**१) सॅक्सन युग–**

साधरणतः ५ व्या शतकापासून ते १०६६ पर्यंतचा काळ हा सॅक्सन युग म्हणून ओळखले जाते. ५ व्या शतकाच्या सुरुवातीला सॅक्सन सैन्यांनी इंग्लंडवर आक्रमण करून इंग्रजांना पराभूत केले व आपले वर्चस्व निर्माण केले. वेसेक्स या राज्याने सत्ता दृढ करून राजा ही संस्था अस्तित्वात आणली. कालांतराने या राजा भोवती राज्यघटना विकसित झाली. या राज्यांनी राज्यकारभाराला सल्ला देण्यासाठी व राजाची निवड करण्यासाठी विद्वान लोकांचे मंडळ स्थापन केले, त्यास 'विटोन' असे म्हणत.

राजाची नियुक्ती व नियंत्रणाचे कार्य ही संस्था करत असल्याने या संस्थेस अनन्य साधारण महत्व होते. या संस्थेत राजघराण्यातील प्रमुख मंडळी, धर्मगुरू, सैन्य प्रमुख, वृद्ध व अनुभवी नागरिक यांना स्थान दिले जाई. कर बसविणे, सैन्य उभारणे, विविध करार, धर्मगुरूंची निवड, राजाची निवड ,पदच्युती इत्यादी कामे ही संस्था करत. या संस्थेचा प्रमुख राजा असला तरी राजाला मर्यादित अधिकार होते. तसेच मंडळाचा सल्ला घेणे आवश्यक असे. एक प्रकारे सल्लागार मंडळ हे त्या काळातील कायदेमंडळ म्हणूनच कार्य करत होते. सॅक्सन काळातच स्थानिक शासन संस्थेची पायाभरणी झाली. लोक ग्रामीण भागात राहत. अनेक खेड्यांचे हंड्रेड व अनेक हंड्रेडचे मिळून परगणा तयार होत. अशाप्रकारे राजा व यावर नियंत्रण ठेवणा–या संस्था निर्माण होऊन संसदीय शासन पद्धतीची सुरुवात झाली.

**२) नॉर्मन युग–**

सॅक्सन वर्चस्वानंतर १०६६ मध्ये राजा विल्यामच्या नेतृत्वाखाली नॉर्मन सैन्यांनी सॅक्सन लोकांचा पराभव करून आपले वर्चस्व स्थापन केले. राजाने जमिनीचे वाटप आपल्या सरांजामदारामध्ये करून स्वतः कडे सर्व सत्ता केंद्रित केली. केंद्रीकरणास विरोध नाहीसा करून आपल्या मर्जीतील अधिका–यांची नेमणूक केली. परिणामी चर्च, स्थानिक स्वराज्य संस्था यात बदल झाला व मध्यवर्ती सत्ता निर्माण झाली. याच काळात सामान्य कायदा या संकल्पनेचा उदय झाला व नवीन संस्था निर्माण झाल्या.

**अ)मेग्नम कौन्सिल (महासमिती)** –

नॉर्मन राजांनी विटोन प्रमाणे मेग्नम कौन्सिल ही संस्था निर्माण केली. यामध्ये प्रतिष्ठीत व्यक्ती धर्मगुरू, राजघराण्यातील लोक, जमीनदार यांचा समावेश होत. राजाने नियुक्त केलेल्या या लोकांच्या सभा वर्षातून तीन–चार वेळा भरत. यात कायदा निर्मिती, कायदादुरुस्ती,राज्याचे धोरण, कारभाराचे परीक्षण याबाबत मंडळ राजाला मदत करत.

**ब)क्युरिया रेजिस (लहान समिती)** –

मेग्नम कौन्सिलच्या विश्रांतीच्या काळात कार्य करण्यासाठी लहान समिती म्हणून मेग्नम कौन्सिलच्या सद्स्यामधून क्युरिया रेजिस ही संस्था निर्माण झाली.यातील सदस्य राजाशी नेहमी साबंधित असत. परिणामी राजाला केव्हाही यांचा सल्ला मिळत असत. दोन्ही समितीतील विषयांची वाटणी करण्याचे अधिकार राजस असत. कालांतराने दोन्ही समितीत अंतर पडून आपापल्या पद्धतीने विकसित होऊ लागल्या. प्रिव्ही कौन्सिल व मंत्रिमंडळाची निर्मिती होण्यास सुरुवात झाली.

**3) मॅग्ना कार्टा** –

राजा जॉन (१११६–११२६) याने त्याच्या काळात जनतेवर अन्याय अत्याचार केले. सरंजामदारांच्या परस्पर कर वसूल करण्याचा प्रयत्न केला परंतु सरंजामदारानी त्याविरुद्ध बंड पुकारले. पुढे संघटीत होऊन सरंजामदार यांनी आपल्या मागण्या, सवलती व हक्क राजा जॉन

यास देण्यास भाग पाडले.या मागण्यांच्या व हक्काच्या सनदेला मॅग्ना कार्टा असे म्हणतात. या सनदे द्वारे सरंजामदाराच्या हक्कांचे रक्षण करण्यात आले तसेच राजाच्या अधिकाराच्या दुरुपयोगाला एक प्रकारे लगाम लावली गेली.

**४) पार्लमेंटचा उदय–**

मध्ययुगीन काळात राज्यकारभाराचा खर्च राजे स्वतः करत. परंतु खर्च अपुरा पडू लागल्यानंतर सरंजामदार सरदार यांची मदत घ्यावी लागत. कालांतराने हेही खर्च अपुरे होऊ लागले व स्थानिक शासनाच्या प्रतिनिधीची मदत घेऊन जादा कर आकारण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. परिणामी महासमितीत सरंजामदार आणि स्थानिक शासनाचे प्रतिनिधी असे दोन भाग झाले. १२६५ मध्ये सायमन डी मॉडफोर्डने पहिली पार्लमेंट बोलावली. त्यात सरदार व नगरांचे दोन नागरिक यांचा समावेश होता. १२९५ मध्ये राष्ट्रीय आणीबाणी प्रसंगी समाजातील जे घटक सहाय्य करू शकतात त्या सर्व घटकांच्या प्रतिनिधीना बोलावले. हीच पार्लमेंट 'मॉडेल पार्लमेंट' म्हणून ओळखली जाते. या पार्लमेंटच्या आमंत्रणाच्या आदेशात असे नमूद केले होते कि "जे सर्वांशी संबंधित आहे ते सर्वांनी संमत केले पाहिजे". पार्लमेंटमध्ये राजा, बिशप्स, एबोट्स, उमराव सरंजामदार, सरदार नागरिकांचा प्रतिनिधी यांचा समावेश होत असे. कालांतराने पार्लमेंटमध्ये दोन प्रवाह निर्माण झाले, हितसंबंधी वर्ग व दुसरा सामान्य जनतेच्या प्रतिनिधीचा वर्ग.पुढे हे दोन प्रहाव उमरावगृह व प्रतिनिधिगृह म्हणून उदयास आले.

**५) पार्लमेंटचे वर्चस्व–**

पार्लमेंटच्या सुरुवातीच्या काळात प्रतिनिधीगृह राजाला पाठींबा व आर्थिक बाबींशी संबंधित होते, परंतु कालांतराने प्रतिनिधीगृहातील सदस्यांचे महत्व वाढू लागले व त्यांच्या संमतीशिवाय एकही पैसा खर्च करत येत नव्हता. १४०७ साली चौथ्या हेन्रीने सर्व आर्थिक बाबींची प्राथमिकता प्रतीनिधीगृहास दिली. पार्लमेंटमध्ये हळू हळू आर्थिक बाबींबरोबरच कायदेविषयक बाबींचेही महत्व वाढत गेले. शासनाचा वाढता खर्च मंजूर करण्यासाठी वारंवार पार्लमेंट बोलवावी लागत परिणामी खर्च मंजूर करण्यापूर्वी सामन्यांचे प्रश्न सोडवावे लागत. अशा पद्धतीने कायदा करणे, कर आकारणे या गोष्टी पार्लमेंटच्या हाती येऊन त्यांचे वर्चस्व निर्माण झाले.

**६) यादवी युद्ध–**

ट्युडर घराण्याच्या कारकिर्दीत राजा व पार्लमेंट यांच्यात फारसा संघर्ष झाला नाही. परिणामी इंग्लंडच्या विकासास हातभार लागला. त्यानंतर आलेल्या स्टूअर्ट घराण्यातील पहिला जेम्स व पहिला चार्ल्स यांनी अनियंत्रित कारभार करून पार्लमेंटची मुस्कटदाबी केली व ११ वर्षासाठी ती रद्द केली. पैसा उभारणीचे सर्व प्रयत्न फसल्याने १६४० मध्ये पार्लमेंट पुन्हा बोलावण्यात आली. परंतु आपसातील मतभेदामुळे यादवी युद्ध होऊन राजा चार्ल्स पराभूत झाला. १६४९ मध्ये सेनापती क्रॉमवेलच्या नेतृत्वाखाली राज्य प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. यादवी युद्धाच्या पार्श्वभूमीवर दुसरा चार्ल्स याने पार्लमेंटच्या मागण्यांना मान्यता व हमी दिल्याने पुन्हा राजेशाहीची स्थापना करण्यात आली.

**७) १६८८ ची रक्तहीन क्रांती–**

राजेशाहीची पुनर्स्थापना होऊनही राजा व पार्लमेंट यांचे संबंध स्पष्ट होऊ शकले नाहीत. १६७९ साली दुसरा चार्ल्स यांच्या काळात पार्लमेंटने जनतेला स्वातंत्र्याची हमी देणारा हेबिअस कॉर्पस कायदा मंजूर केला. त्यानुसार कैद केलेल्या कोणत्याही व्यक्तीला खटला भरल्याशिवाय तुरुंगात ठेवता येणार नव्हते. दुसरा चार्ल्स नंतर आलेल्या दुसरा जेम्स राजाने पार्लमेंट तहकूब करून त्याच्या काळात पुन्हा भरविली नाही. दुसरा जेम्स रोमन कॅथोलिक पंथाचा पुरस्कर्ता असल्याने बहुसंख्यांक प्रोटेस्टंट पंथीयांचा राजाला विरोध होता. तसेच पार्लमेंट तहकूब करणे, चर्चच्या कारभारातील हस्तक्षेप यामुळे रक्तहीन क्रांतीस चालना मिळाली. पार्लमेंटच्या काही महत्वाच्या व्यक्तींनी जून १६८८ मध्ये विल्यम व मेरी यांस जनतेच्या संरक्षणासाठी सैन्यासह आमंत्रण दिले. पार्लमेंटने विल्यम व मेरी यांना गादीवर बसविले. दुसरा जेम्सला कोणाचाच पाठींबा मिळाला नाही परिणामी तो इंग्लंडमधून पळून गेला. या सत्ता बदलत कोणत्याच प्रकरचा रक्तरंजित विरोध न झाल्याने यास रक्तहीन क्रांती म्हंटले जाते. पुढे कन्व्हेन्शन पार्लमेंटने विल्यम व मेरी यांस संयुक्त सार्वभौम म्हणून मान्यता दिली. या क्रांतीचे इंग्लंडच्या राज्यघटनेवर व संसदीय शासन पद्धतीवर अनुकूल परिणाम झाले.

**८) हक्कांची सनद–**

१६८९ साली पार्लमेंटने हक्कांची सनद संमत करून कर व कायदा नियंत्रणाचा पार्लमेंटचा हक्क मान्य करण्यात आला. यानुसार राजाने संमत केलेले कायदे, पार्लमेंटने संमत केलेले कायदे रद्द करण्याचा राजाचा अधिकार, पार्लमेंटच्या मान्यतेशिवाय राजाने केलेली कर आकारणी, उभारलेले लष्कर, समित्या, न्यायालये, या सर्व गोष्टी बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आल्या. या सनदेत भाषा स्वातंत्र्य, चर्चा स्वातंत्र्य, पार्लमेंटच्या स्वतंत्र निवडणुका, वारंवार पार्लमेंट भरवणे या मागण्या करण्यात आल्या होत्या. हक्काच्या सनदेमुळे राजाचे अधिकार मर्यादित झाले. महत्वाच्या कार्यासाठी राजाला पार्लमेंट वारंवार बोलावणे आवश्यक झाले. परिणामी पार्लमेंटचे श्रेठत्व वाढत गेले.

**९)ॲक्ट ऑफ सेटलमेंट–**

तिस–या विल्यमनंतर सत्तारूढ झालेल्या राणी नंतर प्रत्यक्ष वारसाचा प्रश्न निर्माण झाला. प्रोटेस्टट पंथीय वारसाच्या सातत्यासाठी १७०१ मध्ये पार्लमेंटने ॲक्ट ऑफ सेटलमेंट संमत करून हेनोव्हर घराण्यातील सोफिया व तिच्या वारसांना राजपदावर बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. राजपद हे कॅथोलिक पंथीयाकडे अथवा त्यांच्याशी संबंधित कोणत्याही नातलगाकडे जाणार नाही असा निर्णय घेण्यात आला. विल्यम–मेरी व हेनोव्हर घराण्याला पार्लमेंटच्या मान्यतेने राजपद मिळाल्याने पार्लमेंटचे श्रेष्ठत्व राजांनी मान्य केले.

**१०) मंत्रिमंडळाचा उदय–**

पार्लमेंटचे महत्व वाढले तरी राजा व पार्लमेंट एक महत्वाचा दोष म्हणजे दोन्हीही एकमेकांच्या कार्यात परिणामकारक अडथळा निर्माण करत. परिणामी यातून मार्ग काढण्यासाठी राजा व पार्लमेंट यांत समन्वय निर्माण होण्यासाठी मंत्रिमंडळाची निर्मिती करण्यात आली. मंत्रिमंडळाचे नेतृत्व पंतप्रधानाकडे आले. मंत्रिमंडळात्मक शासनपद्धती रूढ होऊ लागली व संसदेचे महत्व वाढू लागले. कालांतराने राजा नामधारी घटनात्मक प्रमुख झाला, पंतप्रधान व मंत्रिमंडळाकडे सत्ता येऊन संसदीय शासनपद्धतीच्या मंत्रिमंडळाची संसदीय जबाबदारीचे तत्व रूढ होऊ लागले.

**समारोप–**

अशाप्रकारे इंग्लंडमध्ये सॅक्सन काळापासून कालांतराने विविध घडामोडी घडत गेल्या पार्लमेंटचा उदय, रक्तहीन क्रांती, हक्कांची सनद, ॲक्ट ऑफ सेटलमेंट या सर्व बाबींचा परिणाम म्हणजे इंग्लंडची संसदीय लोकशाही विकसित होत गेली.

**संदर्भ साहित्य–**

१.डॉ.अजय वसंत गव्हाणे(२०१४), संसदीय लोकशाहीची आयुधे, क्रिएटिव्ह पब्लिकेशन,नांदेड.

२.म.द.देशपांडे(१९७७), शासनसंस्था व तौलनिक विकास,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, कोल्हापूर.

३.डॉ.सु.ग.कुलकर्णी(१९९८), तीन देशांच्या राज्यघटना, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

४. SURESH CHANDRA PANT, CONSTITUTUONAL HISTORY OF ENGLAND, PRAKASHAN KENDRA, LAKHNOW.